
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2024
सकाळ




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि बहाई ॲकॅडमीतर्फे पाचगणी येथे आयोजित तीन दिवसीय नेतृत्व कौशल्य विकास शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी शेजारी डॉ. पी. टी. गायकवाड, लेसन आझादी, आलोक जत्राटकर उपस्थित होते.

# सक्षम नेतृत्वासाठी चांगल्या गोष्टींचे अनुकरण करा : डॉ. शिर्के

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : सक्षम नेतृत्व होण्यासाठी चांगल्या गोष्टींचे अनुकरण करा. करिअरसाठी अभ्यासक्रमाबाहेरील गोष्टी शिकाव्या लागतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

विद्यापीठ आणि बहाई ॲकॅडमीतर्फे पाचगणी येथे आयोजित तीन दिवसीय नेतृत्व कौशल्य विकास शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सर्व क्षेत्रांत नेतृत्व असते. स्वतःला ध्येयापर्यंत घेऊन जाण्यासाठी स्वतःला लीड करणे हा चांगल्या लीडरशीपचे गुण आहे.'

लेसन आझादी म्हणाले, 'नेतृत्व निर्माण करण्यासाठी सातत्याने ऊर्जा तेवत ठेवावी लागते.' विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर, शिबिराच्या समन्वयक सुरेखा आडके उपस्थित होत्या. विद्यार्थी कौशल्य विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. पराग तांदळे यांनी सूत्रसंचालन केले.

17 FEB 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशाच्या विकासात योगदान देणे गरजेचे : प्र. कुलगुरू पाटील

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

भारत हा विकसनशीलच्या प्रवाहातील देश आहे. विकसित देशांमध्ये आपल्याला सामील व्हायचे आहे. २०४७ पर्यंत या देशाचे विकसित होण्याचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. त्यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

येथील शिवराज विद्या संकुल व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कॉम्प्यूटर सायन्स व इनफॉर्मेशन टेक्नोलॉजी' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये बीजभाषक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवराजचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे होते.



**गडहिंग्लज : राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. उपस्थित प्रा. किसन कुराडे, अनिल कुराडे व अन्य.**

प्र. कुलगुरु पाटील म्हणाले, आजच्या गतिशील जगात कॉम्प्यूटर सायन्स व इनफॉर्मेशन टेक्नोलॉजी हे नवनवीन तंत्रज्ञानाने विकसित होत आहे. यावेळी नव्या शैक्षणिक धोरणामुळे शिवराज महाविद्यालयाला स्वायत विद्यापीठ होण्याची संधी आहे. त्यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी शिवराजला नॅक मध्ये 'ए' ग्रेड मिळाल्याबद्दल अभिनंदन केले. सचिव डॉ.अनिल कुराडे, संस्थाध्यक्ष प्रा. किसन कुराडे यांनी मत मांडले.

यावेळी उपाध्यक्ष जे. वाय. बारदेस्कर, अॅड. दिग्विजय कुराडे, डॉ. एस. एस. गोरनाले, प्रा. बिनादेवी कुराडे, डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. किशोर आदाटे, संदीप कुराडे, प्रा.के. एस. देसाई, प्रा. रवी खोत आदी मान्यवर, उपस्थित होते.

सकाळ

# संत सेवालाल महाराज यांना अभिवादन

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठात आज संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात झाली. मुख्य प्रशासकीय भवनात कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रतिमा पवार उपस्थित होते.

लोकमत

# सत्यशीला घोंगडे यांचे संशोधन तृतीय

कोल्हापूर : डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या सेंटर फॉर इंटर डिसिप्लिनरी रिसर्चतर्फे 'नॅनोमटेरियल



आणि बायोटेक्नॉलॉजीचा मेडिकल क्षेत्रामध्ये वापर' यावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. यात शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागातील सत्यशीला दत्तात्रय घोंगडे यांनी सादर केलेल्या संरक्षण उपकरणांसाठी मायक्रोतरंग शोषण उपकरणाला तृतीय क्रमांक मिळाला. सध्याच्या काळात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे विद्युत चुंबकीय तरंगांचे प्रदूषण होते, ते कमी करण्यावर त्यांचे संशोधन सुरू आहे. प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली घोंगडे यांचे संशोधन कार्य चालू आहे.

लोकमत

# नवीन शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शहाजी छत्रपती महाविद्यालयात 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व अकॅडेमिक बँक क्रेडिटचा अवलंब'वर कार्यशाळा झाली. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांचे बीजभाषण झाले. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते.

डॉ. एम. एस. देशमुख म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षक आणि प्रशासनावर आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांसाठी माहितीपत्रके तयार करावीत, स्कूल कनेक्टसारखे अभियान राबवावे व विद्यार्थ्यांना अधिकाधिक माहिती द्यावी.

महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.पी. लोखंडे, विवेकानंद महाविद्यालयाच्याअंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. सिद्धार्थ कट्टीमणी, डी.आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्सच्याअंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. शिवलिंग राजमाने यांनी मार्गदर्शन केले. डॉ. ए.बी. बलुगडे यांनी स्वागत केले. डॉ. आर.डी. मांडणीकर यांनी आढावा घेतला. एस.एस. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. के.एम. देसाई यांनी आभार मानले.

1 7 FEB 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात घुमणार लोकवाद्यांचा आवाज

## बुधवारपासून शिवस्पंदन महोत्सव; गायन, नृत्याचे सादरीकरण होणार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागातर्फे बुधवार (ता. २१) ते शुक्रवार (ता. २३) दरम्यान 'शिवस्पंदन' महोत्सव रंगणार आहे. त्यात विद्यापीठ परिसरात विविध ७५ वाद्यांचा आवाज घुमणार आहे.

या महोत्सवाचे उद्‌घाटन बुधवारी सकाळी नऊ वाजता वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. त्यापूर्वी मुख्य प्रशासकीय इमारतपासून सभागृहापर्यंत रॅली काढण्यात येणार



आहे. उद्‌घाटनानंतर सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीताचा कार्यक्रम होईल. गुरुवारी सकाळी दहा वाजता मूकनाट्य आणि त्यानंतर नकला, लघुनाटिका होईल. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात

### तीनशे विद्यार्थी कलाकारांचा सहभाग

**विद्यापीठ कॅम्पसवरील विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी शिवस्पंदनची सुरूवात केली आहे. यावर्षीच्या महोत्सवात तीनशे विद्यार्थी सहभागी होतील. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त देशभरातील विविध लोकवाद्यांचे वादन या महोत्सवात होणार असल्याची माहिती डॉ. गायकवाड यांनी दिली.**

शुक्रवारी सकाळी साडेसात वाजता क्रांतीवन परिसर, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा परिसर, मुख्य इमारतीसमोर लोकवाद्य वादन होणार आहे. साडेनऊ वाजता एकल नृत्य, समूह नृत्य आणि दुपारी दीड वाजता पुन्हा लोकवाद्य वादन होईल. सायंकाळी साडेसहा वाजता बक्षीस वितरण होणार आहे. महोत्सवातील तीन दिवस सकाळी दहा ते दुपारी एक आणि दुपारी चार ते सायंकाळी सात यावेळेत लोकवाद्य प्रदर्शन आयोजित केले असल्याची माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2024
पुढारी

# २९ रोजी आळिंबी लागवड, प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभाग तसेच अखिल भारतीय समन्वित आळिंबी संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ फेब्रुवारी रोजी मशरूम लागवड व प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठात होणाऱ्या धिंगरी आळिंबी (आयस्टर मशरूम) प्रशिक्षण तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली दिले जाणार आहे. याप्रसंगी आळिंबी संशोधन प्रकल्प, कृषी महाविद्यालय पुणेचे संचालक डॉ. बाबुराव चिरमे, डॉ. अशोक जाधव, कृषी सहायक नामदेव देसाई मार्गदर्शन करणार आहेत. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे सहा. प्रा. डॉ. अभिजित गाताडे कार्यक्रम समन्वयक आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2024

पुण्यनगरी

# विद्यापीठात योग, निसर्गोपचार परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे दि. २१ ते २२ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीयस्तर योग व निसर्गोपचार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात संपन्न होणाऱ्या या परिषदेसाठी नोंदणी करण्याचे आवाहन विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी केले आहे. या परिषदेचा विषय 'योग व निसर्गोपचाराचे नवे आयाम' असा आहे. परीषदेमध्ये देशभरातील विविध तज्ञ मार्गदशकांची व्याख्याने होणार असून योग, निसर्गोपचार, ॲक्यूप्रेशर, आहार, अशा विविध विषयावरील शोधनिबंधाचे सादरीकरण ही होणार आहे. अभ्यासक, विद्यार्थी, डॉक्टर नागरीक यांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विभागातर्फे करण्यात आले आहे. नोंदणीची अंतिम तारीख २० फेब्रुवारी पर्यंत आहे.

17 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूर, सोलापूर, पंढरपूर संघांचे विजय

## खंडपीठ चषक क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ; कोल्हापूर, इचलकरंजीत सामने

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : खंडपीठ चषक क्रिकेट स्पर्धेला शुक्रवारी प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावरील सामान्यांचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व इचलकरंजी येथील सामान्यांचे उद्‌घाटन अतिरिक्त जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मेहबूब बानदार, ॲड. कुमार कोतोलीकर यांच्या हस्ते झाले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर खंडपीठ चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ॲड. तेजगोंडा पाटील आदी.

यावेळी जिल्हा बार असोसिएशनचे सेक्रेटरी ॲड. तेजगोंडा पाटील, क्रीडा विभागप्रमुख शरद बनसोडे, सिनेट सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, अजित पाटील, ॲड. सचिन रेडेकर, ॲड. योगेश सावंत, पंच शिवाजी कामते, आनंद बापट, राजू पांडे व सांगली व सोलापूर वकील संघाचे खेळाडू उपस्थित होते.

पहिला सामना सांगली वॉरियर्स वकील संघटना आणि सोलापूर जिल्हा वकील संघटना यांच्यात झाला. प्रथम फलंदाजी करताना सोलापूर संघाने २० षटकांत सांगलीसमोर १४७ धावांचे लक्ष्य ठेवले. सोलापूर संघाकडून इस्माईल कराजगी यांनी ३१ धावा केल्या. सांगली संघाकडून अभिलाष मिसाळ यांनी तीन गडी बाद केले. सांगली संघाने आव्हान यशस्वीरीत्या पार केले. नीलेश राजेभोसले यांनी ३२ चेंडूंत नाबाद ६१ धावा केल्या.

दुसरा सामना पंढरपूर विरुद्ध सातारा यांच्यात झाला. प्रथम फलंदाजी करताना सातारा संघाने सर्वबाद ३२ धावा केल्या. पंढरपूर संघाकडून प्रसाद वासकरने तीन, नरेन लोखंडेने दोन गडी बाद केले. हे आव्हान पंढरपूर संघाने सहज पार केले. धर्मनाथ वासकर यांनी नाबाद २२ धावा केल्या.

तिसरा सामना कोल्हापूर-ब विरुद्ध सांगली रायझर्स वकील यांच्यात झाला. प्रथम फलंदाजी करताना सांगली संघ सर्वबाद ३६ धावाच करू शकला. कोल्हापूर संघाकडून अतुल रेंदाळे, भानुदास गुरव, दत्ता कांबळे यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. कोल्हापूर संघाने सांगलीचे आव्हान लीलया पार केले. त्यांच्या शंतनू पाटील यांनी नाबाद २४ धावा केल्या.

चौथा सामना कोल्हापूर - अ विरुद्ध सांगली - ब यांच्यात झाला. कोल्हापूर संघाने सुरजित नायर यांच्या तडाखेबंद ७८ व सोमनाथ मुसळे यांच्या ४० धावांच्या खेळीच्या जोरावर २१४ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना सांगलीच्या संघाने १५० धावा केल्या. कोल्हापूरचे संतोष पवार यांनी तीन, तर तेजगोंडा पाटील यांनी दोन बळी घेतले.